MANICKBAG AUTOMOBILES PVT. LTD.
No. 591, Bemciel Industrial Estate, Khanapur Road, NH 4 A, Udyambag, Belagavi.

# ग्लोबल ते लोकल...रोटरी इंटरनॅशनल

प्रतिनिधी
बेळगाव

समाजाच्या गरजा ओळखून समाजाभिमुख उपक्रम राबवण्याचे हे रोटरी या संस्थेचे ब्रीद आहे. रोटरी म्हणजे श्रीमंतांची संस्था हा समज असला तरी त्याला पूर्ण छेद देत रोटरी संस्था कार्य करत आलेली आहे. रोटरी फाऊंडेशनच्या माध्यमातून जगभरात अनेक वेगवेगळे महत्त्वाचे उपक्रम राबविले जातात. बेळगावसुद्धा त्याला अपवाद नाही. रोटरीची स्थापना १९०५ मध्ये झाली. त्यावेळी रोटरी फाऊंडेशनही अस्तित्वात आले.

जागतिक पातळीवर रोटरी फाऊंडेशनने केलेले महत्त्वाचे कार्य म्हणजे पोलिओ निर्मूलन होय. सरकारच्या हाकेला ओ देत रोटरी फाऊंडेशन पोलिओ निर्मूलनासाठी सिद्ध झाल्याने अत्यंत सुसूत्रपणे पोलिओ निर्मूलन करण्यात सरकारला यश आले आहे. आज पाकिस्तान आणि बांगलादेश येथे पोलिओचे काही रुग्ण आहेत. पण पूर्णतः पोलिओ निर्मूलन करण्यात रोटरी यशस्वी होणार, हे नक्की. बेळगावमध्ये रोटरीचे वेगवेगळे क्लब आहेत. मात्र, रोटरी फाऊंडेशनच्या माध्यमातून प्रत्येक क्लबनेच उल्लेखनीय अशी कामगिरी केली आहे.




पोलिओ निर्मूलनार्थ निघालेल्या रॅलीप्रसंगी माजी प्रांतपाल अविनाश पोतदार, व्यंकटेश देशपांडे, अशोक नाईक आदी.



रोटरीने असे फिशकेज उपलब्ध करून दिले आहेत.

### पाणीटंचाईचा प्रश्न दूर करण्याचा प्रयत्न

रोटरी फाऊंडेशनने प्रामुख्याने शाळांमधील पाणीटंचाईचा प्रश्न दूर करण्याचा प्रयत्न केला. १९९७ मध्ये वीरभद्रनगर येथील विहिरीला रोटरीने पुनरुज्जीवित करून विहिरीला पंप बसविला. त्यामुळे आज या परिसराला नियमित पाणीपुरवठा होत आहे. बंद पडलेल्या विहिरी पुनरुज्जीवित करून रोटरीने शहराचा पाण्याचा प्रश्न बऱ्याच अंशाने दूर केला. हे काम पाहण्यासाठी इंग्लंडहून खास पथक आले होते आणि इतकेच नव्हे तर रोटरीच्या सहकार्यामुळे बेळगाव महानगरपालिकेला पाणीपुरवठ्याबाबत दिल्लीमध्ये पुरस्कारही मिळाला.

ठिकठिकाणी स्वच्छतागृह उभे करून लोकांची गैरसोय रोटरीने दूर केली आहे. रेल्वेस्थानक, धर्मवीर संभाजी चौक, साई मंदिर या ठिकाणी रोटरीने स्वच्छतागृहे उभारली व त्याची देखभाल महानगरपालिकेकडे सोपविली. परंतु ही देखभाल योग्यतऱ्हेने होत नसल्याची तक्रार आल्याने पुन्हा रोटरी आता त्याबाबत विचार करत आहे. अंदाजे एका कोटीपेक्षा अधिक रक्कम खर्च करून रोटरीने गोवावेस येथील जलतरण तलाव सुसज्ज केला. यामुळेच आंतरराष्ट्रीय दर्जाचे जलतरणपटू तयार झाले.

### लवकरच फाऊंडेशनतर्फे डायलिसिस सेंटर उभारणार

अंदाजे १ कोटी ७० लाख रुपये खर्च करून रोटरीने कॅम्प कॅन्टोन्मेंट कॉलनी व शरकत पार्क या ठिकाणी जय भारत फाऊंडेशनच्या सहकार्याने सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प राबविला आहे. याशिवाय रक्तदान शिबिर घेणे हे तर रोटरीचे नियमित चालणारे कार्य आहे. लवकरच कोनवाळ गल्ली येथे रोटरीतर्फे अन्य संस्थांच्या सहकार्याने ब्लड बँक उभारण्यात येणार आहे. केएलईमध्ये स्कीनबँक उभारण्यासाठी रोटरी फाऊंडेशन पुढे आले. तर केएलई, सिव्हिल हॉस्पिटल व अन्य हॉस्पिटलना रोटरी फाऊंडेशनने रुग्णवाहिका दिली आहे. लवकरच फाऊंडेशनतर्फे डायलिसिस सेंटर उभारण्यात येणार आहे.

### कोविडकाळात रोटरीची महत्त्वाची भूमिका

कोविडकाळात रोटरीने अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावली आणि सिव्हिल हॉस्पिटलला व्हेंटिलेटर्स दिले. तसेच लसीकरण मोहीमही राबवली. महिला सबलीकरणाचा विचार करून

### अत्यंत महत्त्वाचा उपक्रम म्हणजे शेतकऱ्यांसाठीचा 'ॲप'

रोटरी फाऊंडेशनचा अत्यंत महत्त्वाचा उपक्रम म्हणजे शेतकऱ्यांसाठी तयार केलेले 'ॲप' होय. रात्री-अपरात्री मोटरपंप बंद करण्यासाठी शेतकऱ्यांना उठावे लागते. त्यांची झोपमोड होते, शिवाय रात्री शेतशिवार गाठणे म्हणजे जीवावर उदार होऊन जाणे होय. हे लक्षात घेऊन फाऊंडेशनने त्यांच्यासाठी ॲप तयार केले आहे. त्यामुळे घरबसल्या त्यांना पाणी कधी सोडावे, कधी बंद करावे? हे समजत असून त्यांचा वेळ वाचणार आहे.

### रोटरीचे बेळगावमधून निवडलेले मोनानी पहिले प्रांतपाल

रोटरीचे प्रांतपाल हे अत्यंत महत्त्वाचे आणि प्रतिष्ठेचे पद मानले जाते. विशेष म्हणजे बेळगावमधून आजपर्यंत दहा जणांना हा मान मिळाला आहे. रोटरीचे बेळगावमधून निवडले गेलेले मोनानी हे गृहस्थ पहिले प्रांतपाल होते. त्यानंतर नानी कापडिया, एन. आर. कुलकर्णी, भाऊ नाईक, आनंद सराफ, अविनाश पोतदार, आनंद कुलकर्णी, बबन देशपांडे, शरद पै यांनी हे पद भूषविले असून बेळगावचेच अशोक नाईक हे दहावे प्रांतपाल आहेत.